# दि पूना मर्चंटस् चेंबर

# The Poona Merchant's Chamber

THE POONA MERCHANT'S CHAMBER PMC ESTD 1949

UNITED WE STAND DIVIDED WE FALL

BSCIC JAS-ANZ ISO 9001-2008 Regd.

Register office : Vyapar Bhavan, C-50, Market Yard, Gultekdi, Pune - 411037. MAH - INDIA

| अध्यक्ष | उपाध्यक्ष | सचिव | सहसचिव | माजी अध्यक्ष |
|---|---|---|---|---|
| राजेंद्र बाठिया | अजित बोरा | रायकुमार नहार | इश्वर नहार | प्रविण चोरबेले |
| 98220 37616 | 98902 37799 | 98229 67911 | 94220 79842 | 98220 18661 |


कृपया प्रसिध्दीसाठी

दिनांक : १९/१०/२०२२

## दि पूना मर्चंटस् चेंबर व हमाल पंचायत यांच्या सहकार्याने राबविण्यात येणाऱ्या स्त्री कामगार कल्याण योजने अंतर्गत स्त्री कामगारांना प्रत्येकी रु.१४,०००/ चे बोनस वाटप

पुणे, दि. १९ दि पूना मर्चंटस् चेंबर व हमाल पंचायत यांच्या संयुक्त विद्यमानाने गेली ३४ वर्षे राबविण्यात येत असलेल्या स्त्री कामगार कल्याण योजनेमार्फत गुळ भूसार विभागातील स्त्री कामगारांचा स्नेह मेळावा व बोनस वाटप कार्यक्रम झाला. सुर्यदत्ता इन्स्टिटयूटचे संस्थापक मा. श्री. संजयजी चोरडिया व ए.सी.पी. मा. सुषमाजी चव्हाण व हमाल पंचायतचे अध्यक्ष मा. डॉ. बाबा आढाव उपस्थित होते. त्यामध्ये स्त्री कामगारांना प्रत्येकी रु. १४,०००/- बोनसचे वाटप सुर्यदत्त इन्स्टिटयूटचे संस्थापक मा. श्री. संजयजी चोरडिया व ए.सी.पी. मा. सुषमाजी चव्हाण यांच्या शुभहस्ते करण्यात आले.

सदर प्रसंगी मा. डॉ. संजयजी चोरडिया यांनी सांगितले की, आपआपला व्यवसाय करत असताना आपल्या सामाजिक जबाबदाऱ्या ओळखून दि पूना मर्चंटस् चेंबरतर्फे स्त्री कामगारांसाठी हा उपक्रम केला जातो, चेंबरचे हे कार्य कौतुकास्पद आहे.

पोलीस उपायुक्त मा. सुषमा चव्हाण यांनी या सदर उपक्रमाचे भरभरुन कौतुक केले व असे कष्टकरी महिलांप्रती उपक्रम राबविणारी एकमेव संस्था असल्याचे सांगितले. दि पूना मर्चंटस् चेंबरने कोरोनाच्या काळामध्ये घरी न थांबता पुणेकर जनतेला अविरत धान्याचा पुरवठा केला त्याबद्दल पोलीस दलातर्फे मी त्यांचे अभिनंदन करते.

मा. डॉ. बाबा आढाव यांनी दि पूना मर्चंटस् चेंबरच्या उपक्रमाचे मनापासून अभिनंदन केले. व्यापारी, चेंबर व कामगार यांचे सलोख्याचे संबंध आणखी दृढ व्हावेत, अशी अपेक्षा व्यक्त केली. महिला कामगारांविषयी कळकळीने काम करणारी दि पूना मर्चंटस् चेंबर व हमाल पंचायत ही एकमेव संस्था असल्याचे सांगून महिला व हमाल कामगार याच्यांसाठी अधिक काही करण्याची अपेक्षा व्यक्त केली.


• नोंदणीकृत कार्यालय : व्यापार भवन, सी-५०, मार्केटयार्ड, गुलटेकडी, पुणे - ४११ ०३७. महा. इंडिया

फोन : २४२७११२०, २४२७११३० फॅक्स : ०२०-२४२७११५० मो.: ९६९९३७२७०४

CIN No.: U99999PN1950NPL008348

Website : www.pune-merchants.com • poonamerchantschamber@hotmail.com • poonamerchantschamber@gmail.com

स्त्री कामगार कल्याण योजना समितीचे अध्यक्ष नवीन गोयल यांनी माहिती दिली की, दि पूना मर्चंट्स चेंबर आणि हमाल पंचायतीच्या वतीने घाऊक बाजारपेठेतील महिलांसाठी १९८८ पासून राबविण्यात येत असलेल्या स्त्री कामगार कल्याण योजना अंतर्गत बाजारपेठेत धान्य निवडणे, झाडलोट आदी कामे करणाऱ्या सुमारे ९० महिला कामगारांना दिपावली बोनस देण्यात आला आहे. चेंबरचे अध्यक्ष मा. राजेंद्र बाठिया यांनी याप्रसंगी चेंबरच्या विविध उपक्रमांची माहिती देऊन सांगितले की, चेंबर व हमाल पंचायतच्या सहकार्याने स्त्री कामगारांच्या कल्याणासाठी ही योजना शासनाच्या कोणत्याही मदतीशिवाय गेली ३४ वर्षे अखंडीतपणे सुरु आहे. समारंभाच्या अध्यक्षस्थानी चेंबरचे अध्यक्ष राजेंद्र बाठिया, स्त्री कामगार कल्याण योजनेचे अध्यक्ष नवीन गोयल, चेंबरचे सचिव रायकुमार नहार, सहसचिव ईश्वर नहार, माजी अध्यक्ष प्रविण चोरबेले, जवाहरलाल बोथरा, नितीन नहार, आशिष दुगड, श्याम लड्ढा, हरीराम चौधरी, स्त्री कामगार कल्याण योजना समितीचे सदस्य मुकेश छाजेड, मुकेश गोयल, मुकेश शहा, हमाल पंचायतचे सचिव गोरख मेंगडे, खजिनदार चंद्रकांत मानकर आणि चेंबरचे सभासद उपस्थित होते. कार्यक्रमाचे स्वागत मुकेश गोयल, आभार महिपालसिंह राजपुरोहिजत व सुत्रसंचालन उत्तम बाठिया यांनी केले.

( राजेंद्र बाठिया )
अध्यक्ष